# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

## आरोग्य व स्वच्छता विभाग (मुख्यालय)

### जाहिर सुचना

घनकचरा व्यवस्थापन व हागणदारी मुक्त अभियान (ओडीएफ) कार्यक्रमाचे नियम (उपविधी) मा.महासभेने ठराव क्र.३,दि.२४/०७/२०१७ मंजुर केले असुन त्या अनुषंगाने उपविधीतील नियमांचे भंग करणा-या नागरिकांवर सोबत जोडलेल्या अनुसूची १ दंड सुची नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे.यांची नोंद सर्व नागरिकांनी घ्यावी व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

महाराष्ट्र शासनाने दि.१२/१२/२००६ रोजीच्या क्र.एम.सी.२३२६/४०७४/प्र.क्र.२३८/०६ नी २१ अंतर्गतच्या अधिसुचने प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन त्याच प्रमाणे स्वच्छ भारत अभियान अतर्गत हागणदारी मुक्त अभियान (ODF) कार्यक्रमाचे उपविधीस (आरोग्य व स्वच्छता) तयार करणेबाबत निर्देश दिले आहेत.त्याप्रमाणे या उपविधास मा.महासभेची मान्यात मिळणे करिता रवाना करित आहोत.तरी खालील प्रमाणे क्र.१ ते ९.२ घनकचरा व्यवस्थापन व हागणदारी मुक्त अभियान (ODF) कार्यक्रमाचे नियम (उपविधी) सादर करण्यात येत आहेत.

१. हे उपविधी, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी स्वच्छता आणि आरोग्य उपविधी २०१७ म्हणुन ओळखले जाते आणि तात्काळ प्रचलनात येतील.हे उपविधी जोपर्यत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ प्रमाणे त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी भिवंडी निजामपुर शहरातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये रितसर सुचना देऊन बदलले जात नाहीत तो पर्यत अंमलात राहील.

२. हे उपविधी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील प्रत्येक सार्वजनिक ठिकाणास आणि भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत नागरी घनकचरा निर्माण करणा-या प्रत्येकास आणि कोणत्याही व्यक्तीच्या अथवा संस्थेच्या ताब्यात असलेल्या प्रत्येक वास्तुस/इमारतीस लागू आहेत.

३. या उपविधीमधील आणि त्यासोबत जोडण्यात आलेल्या अनुसूचीतील खालील शब्दांचे अर्थ त्यात व्याख्या केल्याप्रमाणे असतील जसे-

३.१) **अंगण** - कोणत्याही जोगेच्या समोरील अथवा लगतची सार्वजनिक जमा आणि यामध्ये पदपथ आणि तळी,तसेच तळ्याच्या किंवा पदपथाच्या कडेला बसविलेला दगडी कडेपर्यंतची जागा व त्यांनतरचा रस्त्याचा जलवाहक भाग यांचा समावेश होतो.

३.२)**परिमंडळ उपआयुक्त** - भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या परिमंडळ क्षेत्रासाठी आयुक्त यांनी नियुक्त केलेला उपआयुक्त वर्ग १ दर्जाचा अधिकारी

३.३)**सहाय्यक आयुक्त** - भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे/प्रभागाचे सहाय्यक आयुक्त.

३.४)**अभिकरण गुमास्ता/प्रतिनिधी** - भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या वतीने रस्ते झाडणे,कच-यांचे संकलन,दंड आकारणी इ.कर्तव्ये किंवा कामे करण्यासाठी नेमणूक केलेली किंवा परवानगी दिलेली कोणतीही व्यक्ती,व्यवस्था.

३.५)**जैविक विघटनशिल कचरा**- वनस्पती आणि प्राणीजन्य कचरा उदा.स्वयंपाक घरातील कचरा,अन्न,फुले कचरा,अस्ताव्यस्त पडलेली पाने व बागेमधील कचरा,प्राणीमात्रांची विष्ठा, शेण,मासे/मटणाचा कचरा व इतर कोणताही प्राणीजन्य विघटनशिल कचरा किंवा ज्याचे जैविक विघटन होते असा कोणताही कचरा.

३.६)**जैविक वैद्यकिय कचरा**- मानवी किंवा प्राण्यांचे अवयव,रोगनिदान उपचार किंवा लसीकरण किंवा त्यांच्याशी निगडीत संशोधन कार्यातून अथवा जीवशास्त्रासंबंधीच्या चाचण्या यातून निर्माण होणारा या उपविधीच्या अनुसूची ४ मध्ये नमुद केलेला कोणताही कचरा.

३.७)**बायोमिथेनेशन** - मिथेन वायुची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्यासाठी सुक्ष्मजीवांच्या प्रक्रियेव्दारे सेंद्रिय घटकांचे विघटव करण्याची ही प्रक्रिया.

३.८)**अधिकांश कचरा उत्पादक** - मालक,भोगवटादार,गृहनिर्माण संस्था किंवा संकुलाचा मलक किंवा भोगवटादाराच्या वतीने प्रतिनिधीत्व करणारी दुसरी कोणीही व्यक्ती, उपहारगृहे, हॉटेल्स,बाजार,दवाखाने,औद्योगि मालमत्ता आणि व्यापारी संकुले/मॉल्स,शैक्षणिक संस्था यामध्ये कोणतीही सरकारी किंवा सार्वजनिक कार्यालयाची इमारत किंवा अन्य वापरकर्ते जसे क्लब,जिमखाने,विवाह कार्यालये,शैक्षणिक संकुल,इस्पितळे तसेच संबंधित विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी किंवा पालिकेच्या अधिकृत प्रतिनिधीनी विनिर्देशपूर्वक शोधुन काढलेली आणि अधिसूचित केलेली,करमणूक/मनोरंजन संकुले यांचाही देखील अधिकांश कचरा उत्पादक म्हणुन समावेश असेल.

३.९)**पर्यावरण अभियंता** - महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागा अंतर्गत कार्यरत असलेला अभियंता

३.१०)**संकलन** - विहित/विर्नेशित संकलन केंद्र आणि अन्य कोणत्याही ठिकाणाहून अचलण्यात आणि हलविण्यात आलेला नागरी घनकचरा

३.११) **उगम स्थानीचे संकलन** - भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिके तर्फे थेट एखाद्या इमारतीच्या आवारातुन किंवा इमारतीच्या समुहाच्या आवारातून संकलित केलेला नागरी घनकचरा यांस घरोघरी "संकल किंवा "केंद्राकेंद्रागणीक संकलन" असेही संबोधले जाते.

३.१२)**कंपोस्ट खत निर्मिती** - सेंद्रीय घटकांचे सुक्ष्मजीवांच्या मदतीने विघटन करावयाची नियंत्रित प्रक्रिया यामध्ये गांडुळ शेती म्हणजे गांडुळांचा उपयोग करुन जैविक विघटनशील कच-यांचे खतामध्ये रुपांतर करण्याची प्रक्रिया समाविष्ट आहे.

३.१३)**सार्वजनिक सेवा**- रस्ते,पदपथ झाडुन किंवा भिंती,झाडाचा सुरक्षा भाग स्वच्छ करुन घचरा गोळा करुन समाजास सार्वजनिक सेवा देणे.

३.१४)**बांधकाम आणि निष्कासनातुन निर्माण होणारा कचरा**- इमारतीचे बांधकाम, नुतनीकरण दुरुस्ती आणि निष्कासन,प्रचालने यामधून निर्माण होणारा इमारत साहित्यातील कचरा,दगड,निट,माती,डबर इत्यादी.

३.१५)**दत्तक वस्ती योजना** - झोपडपट्टयांमध्ये स्वच्छता राखण्यासाठी समाजाधिष्ठित संस्थामार्फत पुढाकार घेऊन चालविलेली व भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने स्विकृत केलेल्या योजनेस दत्तक वस्ती योजना म्हणतात.

३.१६)**कचरा हस्तांतरण**- कोणत्याही प्रकारचा घनकचरा भिवंडी निजमपुर शहर महानगरपालिकेच्या कामगारांकडे सुपुर्द करणे किंवा असक कचरा स्विकारण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने नेमणूक केलेली अधिकृत किंवा परवाना दिलेली कोणतीही अन्य व्यक्ती अथवा हे करण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने पुरवठा केलेल्या वाहनात किंवा भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने अधिकृत किंवा परवाना दिलेल्या अन्य कोणाहीकडून पुरवनिण्यात आलेल्या कोणत्याही वाहनात कचरा जमा/गोळा करणे

३.१७)**सुकाकचरा** - या उपविधी नियम ५.१(६) मध्ये नमुद केलेल्या नागरी घनकच-याचा प्रकार

३.१८)**सुकाकचरा वर्गीकरण केंद्र** - सुका कचरा स्विकारण्यास आणि वर्गीकरण करण्यासाठी अधिकृत करण्यात आलेल्या महापालिका किंवा शासनाच्या कोणत्याही जागेवरील किंवा सार्वजनिक जागेतील कोणतीही नियोजित जमीन,छपरी,छप्पर असलेले अथवा इतर बांधकाम.

३.१९)**उद्याने आणि बगीच्यामधील मोठ्या प्रमाणातील कचरा** - बागा,उद्याने,वाहतुकीची बेटे इत्यादीमध्ये निर्माण होणारा मोठ्या प्रमाणावरील कचरा.यामध्ये ज्या कच-यांचा दैनंदिन कचरा संकलन पध्दतीत जैविक विघटनशील कच-यामध्ये समावेश होत नाही.अशा गवताची छाटणी फांद्या,डहाळ्या,लाकडाचे ढलपे,पेंढा किंवा झाडांची कापणी इत्यादीसारख्या कार्बनयुक्त घटकांचा समावेस असलेल्या कच-याचा समावेश होतो.

३.२०)**कचरा निर्माता** - भिवंडी निजामपुर शहर महापालिका कार्यक्षेत्रामध्ये नागरी घनकच-याची निर्मिती करणारी कोणतीही व्यक्ती.

३.२१)**घंटागाडी**-भिवंडी निजामपुर शहर महापालिकेने प्रत्येक कचरा संकलन केंद्रावरुन नागरी घनकचरा संकलित करण्यासाठी पुरविलेली घंटा बसवलेली गाडी.

३.२२)**धोकादायक कचरा** - जो कचरा त्याच्या भौतिक,रासायनिक,विषारी स्पोटक गुणधर्मामुळे आरोग्याला किंवा पर्यावरणाला स्वतंत्ररित्या किंवा एकत्रितरित्या धोका करणारा किंवा धोका करु शकणारा/विशिष्ट परिस्थितीत विपरीत परिणाम करु शकणारा किंवा स्फोटक गंजणारा किंवा विषारी कचरा या उपविधीतील अनुसुची-तिन मध्ये वैशिष्टयाने नोंद केलेला आणि धोकादायक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम १९८९ (सुधारात मे.२००३ नुसार)मधिल व्याख्या क्रमांक १४ मध्ये सविस्तरपणे नमुद केलेल्या कच-याचा समावेश होतो.

३.२३)**घरगल्ली** - नाली म्हणून उपयोगात आणण्यासाठी किंवा संडास,मुत्री किंवा मलकुंड किंवा दुर्दधीयुक्त अगर प्रदुषित पदार्थासाठी ठेवलेल इतर पात्र याकडे जाण्यासाठी महानगरपालिकेच्या कर्मचा-यांसाठी किंवा ती साफ करण्यासाठी अगर त्यातील घाण काढून नेण्याकरीता नेमलेल्या व्यक्तीस जाउ देण्यासाठी बांधलेला अलग राखलेला किंवा उपयोगात आणलेला एखादा मार्ग किंवा जमिनीचा पट्टा.

३.२४)**जड घनकचरा**- प्रक्रियेनंतर उतरलेला कोणताही घनकचरा ज्यातील रासायनिक भौतिक आणि जैविक घटकांचा आरोग्यकारी भूमिभरणासाठी योग्य उपयोग होतो.

३.२५)**भूमिभरण**- अंतिम घनकचरा टाकण्याची कचरा विल्हेवाटीची जागा जेथे भूजल सांडपाणी आणि हवे बरोबर उडणारी धुळ,वा-याने उणारा कचरा,दुर्गंधी,आगीपासूनचे उपद्रव,पक्षांची दहशत किटक किंवा कुरतडणारे प्राणी,हरित गृहातुन बाहेर टाकला जाणारा ग्रीन हाऊस गॅस.घसरणीचे अस्थैर्य आणि झीज ह्याच्या प्रदुषणापासुन संरक्षण करणा-या सुविधेच्या संकल्पनेसह उपाययोजना करण्यात आलेली जागा.

३.२६)**केरकचरा**- सर्व प्रकारचा कचरा ज्यात कच-यामुळे अस्वच्छता निर्माण होते किंवा नागरिकांच्या आरोग्यास,सुरक्षिततेस किंवा कल्याणास तसेच पर्यवारणास धोका किंवा उपद्रव निर्माण होतो अशा फेकण्यात किंवा जमा करण्यात आलेल्या या नियमावलीखाली प्रतिबंधित करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही कच-याचा समावेश होतो.

३.२७)**कचरा अस्ताव्यस्त टाकणे** - कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा अशा पध्दतीने टाकणे कि ज्यामुळे कचरा पडेल उतरेल उडून जाईल,झिरपेल किंवा अन्यथा निसटेल किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा पडण्यासाठी उतरण्यासाठी उडून जाण्यासाठी वाहून जाण्यासाठी झीरपण्यासाठी किंवा अन्यथा निसटण्यासाठी कारणीभूत ठरेल अशाप्रकारे टाकण्यात आलेला कचरा.

३.२८)**महानगरपालिका आयुक्त** - महाराष्ट्र महनागरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३६ अन्वये नेमलेला शहराचा महापालिका आयुक्त व त्यामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३९ अन्वये नेमलेल्या हंगामी आयुक्तांचा समावेश होतो.

३.२९)**महानगरपालिका** - शहर म्हणून आोळखल्या जाणा-या अधिक मोठ्या नागरी क्षेत्रासाठी रचना केलेली किंवा रचना केलेली असल्याचे मानण्यात येणारी महानगरपालिका

३.३०) **नागरी घनकचरा** - यामध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपाकेच्या हद्दीत निर्माण होणा-या औद्योगिक धोकादायक कचरा वगळुन जैविक वैद्यकिय कच-यासह व्यापारी आणि अन्य कारणांनी निर्माण होणा-या घन किंवा अर्ध गनकच-याचा समावेश होतो.

३.३१)**उपद्रव** - ज्याच्या योग्य उक्त चक्षुंरेद्रियास,घाणेंदिर्यास.त्वकेंद्रियास किंवा श्रवणेद्रियास इजा,धोका,त्रास किंवा पिडा होते किंवा होणे संभव आहे किंवा जे जिवितास धोकादायक किंवा मालमत्तेस अपायकारक आहे.किंवा होण्याचा संभव आहे अशा कोणत्याही कृत्याचा,वर्तनाचा जागेचा किंवा वस्तुचा समावेश होतो.

३.३२) **सार्वजनिक उपद्रव** - सार्वजनिक टिकाणी कोणत्याही दुर्लक्षीत कृतीमुले उद्‌भवणारा उपद्रव.

३.३३)**उपद्रव शोधक** - भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे या उपविधीनुसार सार्वजनिक उपद्रवाची कृत्ये इत्यादी शोधुन काढण्यासाठी नेमणुक केलेले कर्मचारी नव्याने

३.३४)**ताबेदार** - यामध्ये कोणत्याही कारणासाठी ठराविक काळासाठी एखादी जमीन इमारत किंवा इमारतीचा काही भाग ताब्यात असणा-या किंवा वापर करणा-या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.

३.३५)**मालक** - याचा कोणत्याही परिवास्तुच्या संदर्भातील अर्थ म्हणजे जी व्यक्ती उक्त परिवास्तुचे भाडे घेते ती किंवा ती परिवास्तु भाड्याने दिली असती तर जिला तिचे भाडे घेण्याचा हक्क असतो ती व्यक्ती व त्यामध्ये पुढील व्यक्तीचा समावेश होतो.

१ जो मालकाच्यावतीने असे भाडे घेतो तो अभिकर्ता किंवा विश्वस्त

२ जो धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी असलेल्या कोणत्याही परिवास्तुचे भाडे घेतो किंवा अशी परिवास्तु ज्याच्याकडे सोपविली आहे किंवा तिच्याशी ज्याचा संबंध आहे.असा अभिकर्ता किंवा विश्वस्त

३ उक्त परिवास्तुचा ताबा घेण्यास किंवा तिचा मालक म्हणुन असलेल्या हक्कांचा वापर करण्यास सक्षम अधिकारी असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला धारक समपर्हता किंवा व्यवस्थापक.

३.३६)**व्यक्ती** - एखादी व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती आणि यामध्ये दुकान किंवा आस्थापना किंवा फर्म किंवा कंपनी किंवा संस्था किंवा कायद्याने संस्थापित केलेल्या किंवा न केलेल्या व्यक्तीचा संघ आणि त्याचे प्रतिनिधी व अभिहस्तांकित इत्यादी.

३.३७)**केंद्रा-केंद्रागणिक संकलन** - भिवंडी निजामपुर शहर महानगरापलिकेने नियोजित केलेल्या विशिष्ट कचरा उचलावयाच्या केंद्रावरुन नागरी घनकचरा संकलित करावयाची पध्दत प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने त्याने संकलित केलेला आणि साठवलेला कचरा घंटागाडीत किंवा भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने नेमलेल्या अन्य कोणत्याही वाहनात टाकण्यासाठी तो या कचरा उचलावयाच्या केंद्रापर्यंत आणावयाचा आहे.

३.३८) **आवार** - यामध्ये इमारती;इमारतीतील खोल्या,घर पडघर,तबेला,झोपडी आणि दगड,विटा चिखल,लाकुड,धातु किंवा अशाप्रकारच्या अन्य कोणत्याही साहित्याचा वापर करुन उभारलेली संरचना आणि कोणत्याही मुदतीकरता बांधकाम करण्यात आलेली किंवा राणहे व्यवसाय उद्योगसेवा,धंदा,सरकारी किंवा अन्य कोणतेही सार्वजिनक किंवा खाजगीकरणासाठी जसे लग्ने,मेजवान्या,बैठका,प्रदर्शने आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम इ.साठी तात्पुरत्या स्वरुपात वापरली जाणारी खुला अथवा बंदिस्त जागा यांचा समावेश होतो.यामध्ये ठराविक काळाकरीता वाहने उभी करण्यासाठी,रस्त्यावर विक्री करण्यासाठी,कामाच्या जागी साहित्य साठवून ठेवण्यासाठी किंवा वाहनांच्या रहदारी व्यतिरिक्त एखाद्या सार्वजनिक किंवा खाजगी कारणास्तव वापरण्यासाठी महापालिका आयुक्तांनी परवानगी दिलेल्या सार्वजनिक रस्त्यावरील एखाद्या भागाचादेखील समावेश होतो.

३.३९) **प्रक्रिया** - ज्या प्रक्रियेव्दारे घनकच-यावर पुनर्चक्राकन किंवा तो भूमीभरणासाठी योग्य बनविण्याकरीता,उपचार केले जातात अशी कोणतीही शास्त्रोक्त प्रक्रिया.

३.४०) **सार्वजनिक जागा** - यामध्ये कोणताही रस्ता,उपरस्ता,रेल्वेपूल,गल्ली,पायवाट,बोळ किंवा मार्गिका,महामार्ग,साकव,पूल,नागरिकांना जाण्यायेण्याचा अधिकार असलेला रहदारीचा किंवा रहदारी नसलेला चौक किंवा मार्ग आहे असे उद्यान,बागा,मनोरंजनाची मैदाने,खेळाची मैदाने,समुद्रकिनारे,तळी,तलाव,सार्वजनिक चौक आणि महानगरपालिकेच्या इमारती, सार्वजनिक रुग्णालये,बाजार,कत्तलखाने,न्यायालय इ.समावेश होतो.

३.४१) **कचराकुंडी** - कोणत्याही प्रकारच्या नागरी कच-याची साठवण करण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने वेळोवेळी सूचित व नमुद केल्याप्रमाणे वापरण्यात येणारे डबे किंवा पिशव्यांसह कोणतीही पेटी.

३.४२) **पुनर्चक्राकार** - मुळ उत्पादनाशी मिळते-जुळते असणारे किंवा नसणारे नविन उत्पादन निर्माण करण्याकरीता वर्गीकरण करण्यात आलेल्या अजैविक अविघटनशील घनकच-याचे कच्च्या मालात रुपांतर करावयाची प्रक्रिया.

३.४३) **कचरा** - जैविक/अजैविक/स्थिर अशा वेगवेगळ्या उद्योगातून,प्रक्रियेतून तयार झलेला घन किंवा अर्धघन कचरा ज्याचा वापर किंवा पुर्नप्रक्रिया सद्यस्थितीत करु शकत नाही अशा वस्तू.
३.४४) **आरोग्य राखणे** - रोगाचा प्रतिबंध किंवा पर्यावरणाधीन आजार उद्‌भवू नयेत म्हणून स्वच्छता आणि रोग प्रतिबंधात्मक काम करुन आरोग्य अबाधित राखणे.
३.४५) **अनुसूची** - या उपविधी सोबत जोडलेली अनुसूच
३.४६) **उगमस्थान** - कच-याची निर्मिती जेथे होते असे कोणतेही ठिकाण.
३.४७)**स्थिर जैविक विघचनशिल कचरा** - जैविक विघटनशील कच-यावरील यांत्रिक/जैविक उपचारानंतर उरणारा जैविक स्थिर कचरा (रोगमुक्त) असा स्थिर कचरा जो पुढील बंधनाशिवय वापरता येऊ शकतो.
३.४८)**साठवणूक** - कच-याची विशिष्ट प्रकारच्या कचराकुंडीत तात्पुरती साठवणूक जेणेकरुन कचरा अस्ताव्यस पसरण्यास,भटकी जनावरे व किटकांना आकर्षित करण्यास व प्रमाणाबाहेर किळसवाणा दुर्गध येण्यास प्रतिबंध होईल अशी व्यवस्था.
३.४९)**उद्यान** - अधिक्षक भिवंडी निजामपुर शहर महिनगरपालिकेचे उद्यान अधिक्षक
३.५०) **वाहतुक** - नागरी घनकच-याचे विशिष्ट रचनेच्या वाहनांतून वाहतूक करणे,एका ठिकाणीहून दुस-या ठिकाणी केलेली आरोग्यपूर्ण वाहतूक जेणेकरुन किळसवाणा दुर्गध,कचरा अस्ताव्यस्त पसरणे,सांडणे किंवा अप्रेक्षणीय दृश्य यांना प्रतिबंध होईल.
३.५१)**विभाग कार्यालय** — भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त/उपआयुक्त प्रमुख असलेले प्रशासकिय विभागाचे कार्यालय या उपविधीमध्ये वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा व शब्दसमुहांचा अर्थ उपरोक्त व्याख्येमध्ये समाविष्ट नसल्यास त्याचा अर्थ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिय १९४९ किंवा पर्यावरण अधिनियम १९८६ व नागरी घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियमावली २००० मध्ये तसेच महाराष्ट्र जैविक अविघटनशील कचरा नियंत्रण कायदा २००६ ने निर्देशित केलेले महाराष्ट्र जैविक अविघटनशिल कच-यासंबधीचे महापालिक हद्दीतील संकलन वर्गीकरण व विल्हेवाटीचे नियम २००६ मध्ये ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तो अर्थ विशिष्ट संदर्भात घ्यावा.
**४. साफ अंगणाची हमी देण्यासाठी अस्वच्छता पसरण्यास आणि कचरा टाकण्यास प्रतिंबध -**
४.१) **सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरवणे** - कोणत्याही व्यक्तीने अधिकृत सार्वजनिक अथवा खाजगी कचरा कुंड्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकता किंवा जमा करता कामा नये.
४.२) **खाजगी मालमत्तेच्या ठिकाणी कचरा टाकणे** - कोणत्याही व्यक्तीने अधिकृत खाजगी किंवा सार्वजनिक कचरा कुंड्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्याप्त,मोकळ्या किंवा रिकाम्या खाजगी मालमत्तेच्या वास्तव्य असलेल्या अथवा नसलेल्या ठिकाणी कचरा टाकु किंवा जमा करु नये.
४.३) **वाहनांतून फेकला जाणारा कचरा** - वाहनातील वाहनचालक किंवा प्रवासी कोणीही व्यक्ती चालत्या किंवा स्थिर वाहनातून कोणत्याही रस्त्यावर,मार्गावर,पदपथ,खेळाची मैदान,उद्याने,रहदारीच्या जागा,तलाव,नदी,खाडी,समुद्र किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणार किंवा जमा करणार नाही.
४.४)वाहतुकीच्या वाहनातून सांडणारा कचरा कोणतीही व्यक्ती कचरा वाहतुकासाठी त्या भरलेला कचरा केरकचरा सांडण्यास,उडून जाण्यास अथवा रस्ता,पदपथ,रहदारीच्या जागा खेळांचे मैदान,उद्यान किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी जमा होण्यास प्रतिबंध होईल अशा पध्दतीने रचना असलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर वाहन चालविणार किंवा हलविणार नाही.
४.५)सार्वजनिक उपद्रव निर्माण करणे कोणीही व्यक्ती पुरविण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधा किंवा सुखयोई वगळता अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी आंघोळ करणे,थुंकणे,मलमुत्र विसर्जित करणे,उघड्यावर शौचास बसणे तसेच वांरवार उघड्यावर शौचास जाणे,रस्त्यावर भांडी किंवा रस्त्यावर व्यावसायिकपणे वाहने धुणे हि कामे करणार नाही किंवा कोणत्याही प्रकारची साठवण ठेवणार नाही.

४.६)साफ अंगणाची हमीप्रत्येक मालक अथवा भोगवटादार निवासी जागेव्यतिरिक्त स्वच्छ अंगण परिक्षीत ठेवण्यास जबाबदार राहील.तसेच इमारतीची मलवाहिनी/जलवाहिनी,पाईप लिकेज मुळे इतरांना बाधा होत असल्यास दहा दिवसात दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.

**५ नागरी घनकच-यांचे वर्गीकरण,साठवण,पुरवठा आणि संकलन -**

**५.१)विशिष्ट प्रकारात कच-याचे वर्गीकरण** नागरी घनकच-याची निर्मिती करणा-या प्रत्येकाने कचरा खाली निर्देशित केलेल्या सहा वेगवेगळ्या प्रकारामध्ये कच-यांचे वर्गीकरण करुन तो वेगवेगळा साठवला पाहिजे व असा वर्गीकरण केलेला कचराच अधिकृत साठवणी केंद्राकडे नेण्यासाठी तयार ठेवला पाहिजे.त्याच प्रमाणे उघड्यावर कचरा टाकणे,झोपडपट्टी परिसर,सोसायटी मध्ये घरातील जमा झालेला कचरा,कारखाना मधील कचरा इत्यादी

१. जैविक विघटनशील (ओला) कचरा

२. घरगुती विशिष्ट घातक घनकचरा

३. जैविक वैद्यकिय कचरा

४. बांधकाम आणि निष्कासन यातून निर्माण होणारा कचरा

५. झाडाच्या छाटणीसह उद्यान आणि बागकामातून निर्माण होणारा कचरा

६. पुनर्चक्राकन करण्यायोग्या आणि पुनर्चक्राकन न करण्याजोग्या कच-यासह इतर सर्व अजैविक कचरा (सुका कचरा )

७. नादुरुस्त झालेली इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक उपकरणे (ई-वेस्ट)

महानगरपालिका आयुक्त ह्या उपविधीच्या अंमलबजावणीसाठी प्रथमत उपरोक्त वर्गीकरण र्यादित करुन,कचरा निर्माण करणा-यामधील जागरुकतेची पातळी व शहरातील पायाभूत आधारांची उपलब्धता विचारात घेऊन स्वतंत्रपणे विविध टप्पे अधिसूचित करतील.

५.११) कच-यांची कोणत्याही प्रकारची मानवी हाताळणी न करता किंवा तो न सांडता त्याचे सुरक्षित रित्या आणि सहजपणे संकलन व्हावे म्हणुन विविध प्रकारच्या घनकच-याची साठवण आणि पुरवठा करण्यासाठी महापालिका आयुक्त अनिवार्य रंगसंहिता आणि अन्य विहित कचरा कुंड्यांचा तपशिल वेळोवेळी स्वतंत्रपणे अधिसूचित करतील आणि तो विविध प्रकारचा घनकचरा निर्माण करणा-यास बांधिल राहील.

५.२) **वर्गीकरण करण्यात आलेल्या कच-याचा पुरवठा -** कुठल्याही जमिनीवर अथवा मालमत्तेमध्ये जमा झालेला कचरा गोळा करुन व त्यांचे वर्गीकरण करुन तो महापालिकेने कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या कर्मचा-यांकडे सुपुर्द करणे अथवा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या वाहनात टाकणे हे त्या जमिनीच्या अथवा मालमत्तेच्या मालकाचे अथवा भोगवटदाराचे कर्तव्य राहील.

५.३)**जैविक विघटनशिल कचरा-** वर्गीकरण करण्यात आलेला जैविक विघटनशील नागरीक घनकचरा (अनुसूचि – दोन मधिल स्पष्टीकरणात्मक यादी प्रमाणे) जर कचरा निर्माण करणा-या कडून त्यांचे खत करण्यात आले नाही. तर त्याने असा कचरा त्याच्या जागेत साठवावा आणि प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने हा कचरा घंटागाडीत किंवा मोठ्या प्रमाणावर जैविक विघनशिल कचरा संकलित करणा-या वाहनात किंवा मोठ्या प्रमाणावर जैविक विघटनशील कचरा संकलित करणा-या वाहनात किंवा संबंधित सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांनी वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने ठरविलेल्या ठराविक वेळी कचरा दिला जात आहे याची खातरजमा करावी.

५.४)**सर्व कचरा निर्माण करण-याकडून खतनिर्मिती -** कच-याचा परिवहन कमी करण्यासाठी कच-यापासुन स्थानिक खतर्निमी करण्यास उत्तेजन देण्यात येईल.

५.५) **विनिर्दिष्ट घरगुती धोकादायक कचरा (अनुसूची तीन मध्ये दिलेल्या यादीनुसार)** प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा धोकादायक कचरा साठवून तो कचरा संकलित करण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकारीत करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अभिकरणाव्दारे साप्ताहिक /ठराविक कालावधीत पुरविण्यात येणा-या संकलन वाहनात किंवा महाराष्ट्र सरकार किंवा महाराष्ट्र प्रदुषण

नियंत्रण मंडळाकडून अनिवार्य करण्यात आल्याप्रमाणे अशा कच-यांची पध्दतशीर विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरीता नियोजित केलेल्या केंद्रावर नेऊन दिला पाहिजे.

**५.६) प्रक्रिया न केलेला जैव-वैद्यकिय कचरा (अनुसूची ४ मध्ये दिलेल्या यादीनुसार)**

प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा कचरा विनिर्दिष्ट प्रकारच्या बंदिस्त कचरा पेट्यात साठवून तो कचरा संकलित करण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून जैविक वैद्यकिय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी ) नियमावली १९९८ नुसार अनिवार्य करण्यात आल्याप्रमाणे अशा कच-याची पध्दतशीर विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरीता नियोजित केलेल्या केंद्रावर नेऊन दिले पाहिजे.

५.७)बांधकाम आणि विष्कासनातून निर्माण होणारा कचरा बांधकाम आणि निष्कासनातून निर्माण होणारा कचरा,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने असा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीने निर्देशित केलेल्या ठिकाणी व निर्देशित केलेल्या वेळातच साठविला व सुपुर्द केला पाहिजे.छोट्या प्रमाणवार म्हणजे घरगुती पातळीवर असा कचरा निर्माण करणा-यांनी त्यांचे जागीच वर्गीकरण करुन महानगरपालिकेच्या मदत क्रमांक वर दुरध्वनी करुन अथवा असा कचरा गोळा करम्यासाठी नेमलेल्या व्यक्ति अथवा संस्थेशी संपर्क साधुन हा कचरा सुपुर्द करावा व त्यांच्या वाहतुकीचे शुल्कही संबंधितांना द्यावे. महानगरपालिकेच्या मदतकेंद्र दुरध्वनी क्रमांकाचे तपशिल पालिकेच्या विभाग कार्यालयात उपलब्ध होतील.

**५.८)इतर सर्व अविघटनशील (सुका) कचरा**

पुनर्चक्रांकित आणि अपुनर्चक्रांकित या उपविधीतील नियम क्र.५.१(६) मध्ये उल्लेख केल्या प्रमाणे प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने हा कचरा साठवून तो अशाप्रकारचा कचरा संकलित करण्यासाठी संबंधित सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यानी वेळोवेळी अधिसूचित केलेल्या ठिकाणी आणि वेळी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेकडून किंवा तिच्या प्रतिनिधीकडून पुरविण्यात आलेल्या सुका कचरा संकलित करावयाच्या वहनांमध्ये किंवा अनुज्ञप्ती/परवाना मिळालेला सुका कचरा वेगवेगळा करावयाच्या केंद्रावर नेऊन द्यावा अविघनशील सुक्या कच-याची हाताळणी महाराष्ट्र अविघटनशिल घनकचरा (महापालिका हद्दीत योग्य व शास्त्रीय पध्दतीने संकल साठवणूक व विल्हेवाटीचे नियम)२००६ च्या नियम ३(२) (१) नुसार झाली पाहिजे.

५.९)मोठी उद्याने आणि बागबगीच्यामधील कचरा हा कचरा एकत्रित न करता ठेवला पाहिजे आणि त्यांचे उमगस्थानी खतात रुपांतर केले पाहिजे.संकलन अनुसूचीसह झांडाची छाटणी आणि साठवण करणे आणि ती नेउन टाकणे यासाठी उद्यान अधिक्षक किंवा संबंधित सहाय्यक आयुक्तांनी सुचना/मार्गदर्शन तत्वे अधिसूचित करावीत.ज्याठिकाणी खतनिर्मिती करणे शक्य होणार नाही.त्याठिकाणी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका आणि ती नेउन टाकणे यासाठी उद्यान अधिक्षक किंवा संबधित सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांनी सुचना/मार्गदर्शक तत्वे अधिसुचनित करावीत ज्याठिकाणी खतनिर्मती करणे शक्य होणार नाही त्याठिकाणी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका वेळोवेळी अधिसुचित करण्यात येणार योग्य शुल्क आकारुन वर्गीकरण करण्यात आलेली उद्याने आणि बागबगीचा कचरा संलित करणे आणि त्यांचे परिवहन करणे चालू ठेवील.

५.१०)सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे सार्वजनिक ठिकाणी कचरा डब्याच्या बाहेर किंवा इतर न निर्देशित ठिकाणी कचरा टाकण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

५.११)कचरा जाळणे रस्त्याच्या कडेला किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा घनकचरा जाळण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

६ भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या बंधनकारक जबाबदा-या

६.१)परिवहन कंत्रटदार/भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे कर्मचारी ह्यांच्या विरुध्द कारवाई जर कंत्राटदारांच्या कोणत्याही कामगारांने किंवा भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कोणत्याही कर्मचा-यांने कोणत्याही संकलन केंद्रावरील वर्गीकृत कचरा एकत्रित केला किंवा अनुसूचीतील विनिर्दिष्ट वेळेप्रमाणे कचरा उचलला नाही तर भिवंडी

निजामपुर शहर महानगरपालिका परिवहन कंत्राटदार आणि/किंवा भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कर्मचा-याविरुध्द दंडाच्या आकारणीसह कडक आणि त्वरेने कारवाई करेल.

६.२)मुलभूत संरचनांची उपलब्धी या उपविधीचे पालन करण्यास सहकार्य देण्यासाठी महानगरपालिका पुरेशा मुलभूत सुनिधा पुरवणे कचरा संकल सेवेबरोबर नागरिकांचा सल्ला घेउन जिथे शक्य व आवश्यक असेल तेथे कचरा डबे सुकाकचरा वर्गीकरण केंद्र खतनिर्मिती केंद्र स्थापन करण्यात येतील झोपडपट्टी भागात सार्वजनिक जागेवर मलमुत्र निसर्जन धुणे व आंघोळ करणे असे उपद्रव रोखण्यासाठी स्थानिक सामाजिक संस्थांच्या सहभागाने पुरेशी सार्वजनिक शौचालये पुरविली जातील.

६.३)नागरी आधारभुत माहिती भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कच-यापासुन खतनिर्मिती तसेच सुक्या कच-याचे पुनर्चक्रिकरण यासंबधीची माहिती सुका कचरा साठवणुक केंद्रमार्फत व पालिकेच्या संकेत स्थळामार्फत उपलब्ध करुन देईल.

६.४)जैविक विघटनशिल पूजा साहित्य महानगरपालिका इच्छुक संस्थांना समुद्रकिनारा तलाव डोह आदी जलस्त्रोतालगतच्या ठराविक ठिकाणाहुन जैविक विघटनशिल पूजा साहित्य (फळे,फुले.पाने इत्यादी)त्यासाठी बनविलेल्या खास पात्रात किंवा कलशात संकलन करण्यासाठी अधिकृत करेल या कलसामधील गोळा केलेल्या साहित्यापासुन प्रामुख्याने योग्य स्थळी खतनिर्मिती करण्यात येईल.

६.५)ठिकठिकाणी जाऊन कचरा गोळा करण्याची सेवा कच-याच्या ठराविक ठिकाणाहून ठराविक वेळी संकलनासाठी आवशयक असलेली घंटागाडी उपलब्ध करुन देण्यात येईल.या गाडीत कचरा सुपुर्द करण्याची जबाबदारी कचरा उत्पादकाची आहे. विशिष्ट वर्गीकरणातील कच-यासाठी वेगवेगळ्या विभागावर घंटागाडीच्या वेळ कचरा स्विकारण्याची ठिकाणे आणि मार्ग निश्चित करुन संबंधित सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांनी पुर्वसुचित करायचे आहे.

६.६)उगमस्थानीच कचरा संकलन इमारतीचे किंवा अनेक इमारतीच्या आवारात असलेल्या निश्चित कामगारांना सहा.आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांनी पुर्वनिर्देशित केलेल्या वेळी प्रवेश दिल्यास नागरी घनकच-याचे उगम स्थानाजवळ मार्गिका उपलब्ध करु दिल्यास संकलन करण्याची सुविधा महापालिकेतर्फे पुरविण्यात येईल.

६.७)भूमिभरणामध्ये येणा-या कच-याची माहिती भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या विविध भूमिभरणा मध्ये येणा-या वेगवेगळ्या प्रकारच्या कच-याचे प्रमाण दर्शविणारी माहिती भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेमार्फत प्रसिध्द केली जाईल.

**६.८)सार्वजनिक जागेतील सामुदायिक कचरा कुंड्या-**

अ)जोपर्यंत उगम स्थानीच कचरा संकलन करणेसाठी अथवा ठिकठिकाणी जाऊन ठराविक कालांतराने कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडीची व्यवस्था भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका करीत नाही तोपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणुन सार्वजनिक जागा अथवा सार्वजनिक रस्त्यावरील विहित ठिकाणी कचरा कुंड्या पुरविण्याच व त्यांची देखभाल करण्याचे काम भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने नेमलेल्या प्रतिनिधीमार्फत केले जाईल त्यासंबंधीची माहिती संकेत स्थळावर भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने प्रसिध्द केली पाहिजे.

ब)कचरा उत्पादन करणा-याने कच-याचे वर्गीकरण करुन तो सार्वजनिक कचरा कुंडीत टाकला पाहिजे व त्यानंतर तो भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेतर्फे संकलित केला जाईल.या कचराकुंडीची देखभाल भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका अथवा अभिकरणातर्फे केली जाईल जेणे करुन वर्गीकरणाची पुर्तता होईल व सार्वजनिक उपद्रु अथवा आरोग्यास धोका निर्माण होणार नाही यांची दक्षता खात्रीपुर्वक पुर्तता करता येईल.प्रत्येक सार्वजनिक कुंडीमध्ये जैविक विघटनशिल व अविघटनशिल कच-यासाठी कमीत कमी दोन स्वतंत्र कचराकुंड्या असतील अशा सर्व जागेचे तसेच कचरा उचलण्याचे वेळापत्रक व व्यवस्थेचा तपशिल संबंधित विभाग कार्यालयात आणि महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध असेल.

क)कोणत्याही क्षणी सार्वजनिक कुंड्या भरुन वाहणार नाहीत अथवा खुल्या वातावरणात कचरा उघड्यावर पडणार नाही.तसेच मोकाट जनावरे,पक्षी,कचरा गोळा करणारे इत्यादीकडून कचरा पसरविण्यास प्रतिबंध करण्याची खबरदारी सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला आधिकारी यांची घ्यावयाची आहे.

६.९)सुकाकचरा प्रतवारी निवडकेंद्र पुर्नचक्रिकरणीय व अपुर्नचक्रिकरणीय कच-यांचे वर्गीकरण व नियमन करणे सोपे जावे म्हणुन भिवंडी निजामपुर शहर महागरपालिकेकडून शक्य तेथे व आवश्यक तेवढी कोरड्या कच-यांची प्रतवारी केंद्र उपलब्ध करुन देम्यात येतील ही केंद्र महानगरपालिकेच्या सरकारी किंवा इतर कुणाच्याही मालकीच्या पण कच-यांची प्रतवारी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या जागेवर किंवा पत्राचे शेड,झोपडी अशा सार्वजनिक ठिकाणच्या सुयोग्य जागी असतील.कचरा गोळा करणा-याच्या नोदणीकृत सहकारी संस्थेमार्फत पुनर्श्चप्रक्रिया परवानाधारक किंवा महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या इतर यंत्रणमार्फत चालविण्यात येतील.प्रतवारीनंतर उरलेला अविघटनशिल कचरा वेळोवेळी संकलित करुन प्रक्रियेसाठी किंवा नष्ट करण्यासाठी नेण्यात येईल.अशा केंद्रातील कचरा जवळून जाणा-यांना दिसणार नाही अशा पध्दतीने ह्या केंद्रांना कुंपण घालण्यात येईल/झाकण्यात येतील

६.१०)कचरा संकलनाचे वेळापत्रक आणि मार्गिका - वेगवेगळ्या प्रकारच्या कच-याचे जसे संकलन मार्ग आणि वेळापत्रक निश्चित करुन त्याची पुर्वसुची सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांचमार्फत देण्यात येईल.तपशिलवार माहिती संबंधित विभाग कार्यलयात तसेच महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.त्याचबरोबर बांधकाम आणि निष्कासन कचरा,बागा आणि उद्यानातील कचरा संकलनाची व्यवस्था पर्यावरण अभियंता उद्यान अधिक्षक किंवा संबधित सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांचेमार्फत नागरिकांसाठी आणि मोठ्या कचरा उत्पादकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

६.११)अचानक तपासणी - सहाय्यक आयुक्त किंवा महानगरपालिकेचा प्राधिकृत अधिकारी अथवा प्रतिनिधी यांना आवश्यक तितक्या मदतनिसासह दिवसभरातील कोणत्याही वेळात कोणत्याही जागी प्रवेश करुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने या उपविधीखाली सोपविलेली कोणतीही जबाबदारी पार पाडण्यासाठी व ती कोणत्या प्रकारे पार पाडावी हे ठरविण्यासाठी तसेच या उपविधीच्या कलमांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी तपासणी करता येईल.

६.१२)प्रत्येक विभागातील उपद्रव सोधक पथके घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांनी उपद्रव शोधकांची सध्याची व्यवस्था बळकट करुन योग्य वाहने व गणवेष उपद्रुव शोधकांना उपलब्ध करुन देतील.

६.१३)प्रसिध्दी नागरिकांना द्यावयाच्या माहितीची सेवा या उपविधीतील तरतुदीबाबत फलक जाहिराती छापील हस्तपत्र रस्त्यावरील सुचना आकाशवाणी व दुरदर्शन वर्तमानपत्रातील लेख आणि अन्य कोणत्याही योग्य माध्यमाव्दारे प्रसिध्दी येईल.जेणेकरुन सर्व नागरिकांना त्यांच्या वैधानिक कर्तव्याबाबत आणि भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या पुरर्चक्रांकन कचरा आणि कचरा होउन न देण्याच्या सेवा आणि दंडाबाबत माहिती उपलब्ध होईल.

६.१४)नियुक्त अधिकारी आणि कालबध्द अहवाल- सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी आपल्या अख्त्यारित अधिकारी नियुक्त करतील हा अधिकारी महापालिकेच्या या उपविधी मध्ये दिलेल्या अनिवार्य जबाबदा-यांच्या अंमलबजावणीस उत्तरदायी असेल.या जबाबदा-या सुक्ष्म नियोजन आणि संबंधित आर्थिक वर्षाच्या वेळापत्रकानुसार पार पाडण्यात येतील

६.१५)पारदर्शकता आणि सार्वजनिक सुगमता भिवंडी निजामपुर महानगरपालिकेच्या पारदर्खता आणि

सार्वजनिक सुगमतेची अधिकत्तम खातरजमा करण्याच्या उद्देशाने जी माहिती भिवंडी निजामपुर महानगरपालिकस प्रसिध्द करावयाची आहे ती माहिती भिवंडी महानगरपालिकेच्या वेबसाईटवर या वेबसाईटव्दारे प्रसिध्द केली जाईल.

६.१६)प्रशासकिय यंत्रणांशी समन्वय या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने महानगरपालिका सर्व शासकिय यंत्रणांशी प्राधिकरणाशी संबधित यंत्रणेच्या कार्यक्षेत्रात होणा-या कामांबाबत समन्वय साधेल.

७)भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या किंवा काही विनिर्दिष्ट प्रकारच्या/ परिस्तिती बाबतीत कचरा निर्माण करणा-यांच्या बंधनकारक जबाबदा-या काही विशिष्ट परिस्थितीचे स्वरुप लक्षात घेऊन खालील जबाबदा-या विनिर्दिष्टपणे अनिवार्य करण्यात आलेल्या आहेत.

**७.१ झोपडपट्टया**

७.१.१) आतापर्यत न पोहोचलेल्या झोपडपट्यांमध्ये घनकचरा व्यवस्थापन कामासाठी विभागीय सहाय्यक आयुक्त दत्तक वस्ती योजना राबविण्याची कार्यवाही करतील

७.१.२)शक्य त्याठिकाणी आवश्यक असलेल्या त्या झोपडपट्टीच्या जवळपास विभक्तीकरण केलेला कचरा उचलण्यासाठी निश्चित वेळापत्रकानुसार महापालिकेची घंटागाडी पुरविण्यात येईल.

७.१.३)काही विशिष्ट ठिकाणी आवश्यकतेनुसार घंटागाडीची व्यवस्था करण्याच्या कालावधीत पर्यत सार्वजनिक रस्त्यांवर आवश्यक ठिकाणी मनुष्यबळासह कचराकुंड्या ठेवण्यात येतील व त्या महानगरपालिकेतर्फे परिरक्षित केल्या जातील.अशा ठिकाणी विभक्तीकरण केलेल्या कच-याची साठवणूक करता येईल व महानगरपालिका असा विभक्तीकरण केलेला कचरा उंचलण्याची व्यवस्था करेल.

७.१.४) स्थानिक नगरसेवक,नागरिक संघटना,शासकिय/अशासकिय संस्था/सामुदायिकसंस्था यांच्या सहकार्याने तसेच झोपडपट्टयांच्या आत स्वच्छता राखण्यासाठी वेळोवेळी दत्तक वस्ती योजना चालविणा-या सामाजिकृत संस्थांच्या मदतीने महानगरपालिका स्वच्छता अभियाने राबविल.

७.२ कोंबड्या मासळी.कत्तलीचा कचरा (विवक्षित कत्तलखाने व मांड्या सोडून इतर जागेवरचा)

७.२.१)विवक्षित कत्तलखाने आणि मंड्या सोडून इतर मालक/भोगवटादार जे कोंबड्या,मासळी आणि कत्तलींचा कचरा निर्माण करतील असे मालक/भोगवटादार यांनी निर्माण केलेला कचरा आरोग्यदृष्ट्या बंदिस्त,सुरक्षित ठिकाणी साठवतील आणि निश्चित केलेल्या ठिकाणी या कामासाठी पुरविण्यात आलेल्या हवाबंद स्वरुपात आरोग्यकारक स्थितीमध्ये महानगरपालिकेने पुरविलेल्या वाहनांवर,ठरविलेल्या स्थळी व वेळात जमा करतील.अशा स्वरुपाच्या कच-यासाठी नियमित कचरा कुंड्यांचा वापर करु नये.तसे केल्यास अशा कत्तलखाने व कोंबड्यांच्या खुराड्यांचे मालक यांच्याविरुद दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

७.२.२)भिवंडी निजाभपुर शहर महापालिकेचा बाजार विभाग बाजारामध्ये कमाल आरोग्यकारक स्थिती राखण्यासाठी बाजाराची स्वच्छता राखण्यासाठी,त्यांचे पुनरारेखन करुन बाजारामध्ये स्वच्छता व आरोग्यदायक स्थिती राखण्यासाठी बाजार विभागाची जबाबदारी राहील.

७.३)विक्रेते/फेरीवाले सर्व विक्रेते/फेरीवाले यांच्यावर त्यांनी तयार केलेला जैविक कचरा व इतर कचरा वेगवेगळा ठेवण्यासाठी योग्य त्या डब्यांची व्यवस्था करणे बंदनकारक आहे.असा वेगवेगळा केलेला कचरा महापालिकेने उपलब्ध केलेल्या घंटागाडीमध्ये किंवा जवळच्या सार्वजनिक कचरा कुंडीमध्ये नेऊन टाकण्याची जबाबदारी संबंधित विक्रेता/फेरीवाल्यांची असेल,अन्यथा ते दंड सूचीमध्ये नमुद केलेल्या दंडासाठी पात्र होतील.प्रत्येक फेरीवाला त्यांच्या आजूबाजूचे अंगण साफ ठेवण्यास जबाबदार राहील.

**७.४ घरगल्या -**

७.४.१)अशा परिक्षेत्राचे जे मालक/भोगवटादार घरगल्ल्यांतील स्वच्छतेसाठी महापालिकेची सेवा उपभोगु इच्छित असतील,त्यांना महानगरपालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयाकडे अर्ज करणे व महानगरपालिकेने सुचित केल्यानुसार,वेळोवेळी कचरा निर्मुलन आकार भरणे बंधनकारक आहे.

अशा प्रसंगी संबंधित मालक/भोगवटादार त्या ठिकाणाचा कचरा काढण्यासाठी योग्य मार्गिका उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असतील.

७.५ मालकिच्या/पाळीव प्राण्यांपासुन होणारा कचरा - सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक रस्त्यावर पाळीव प्राण्यांनी केलेला कचरा काढणे व ती जागा स्वच्छ ठेवणे तसेच त्यांच्या स्वतःच्या सांडपाणी व्यवस्थेत त्या कच-याची योग्य विल्हेवाट करणे ही त्या पाळीव प्राण्याच्या मालकांची जबाबदारी असेल.

७.६ सार्वजनिक मेळावे व कार्यक्रम

७.६.१)सार्वजनिक,खाजगी,वैयक्तिक जागेवर कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आल्यानंतर सदर कार्यक्रम समाप्तीनंतर २४ तासांमध्ये उपरोक्त जागेची स्वच्छता करणेची जबाबदारी संबंधितांची असेल १००० चौ.फुटांपेक्षा जास्त जागेवरील कार्यक्रमासाठी २५ पैसे प्रति चौ,फुट प्रमाणे कार्यक्रमास परवानगी देताना अनामत घेण्यात यावी.व कार्यक्रम समाप्ती नंतर २४ तासांमध्ये सदर जागेची स्वच्छता न केल्यास कचरा उचलण्यासाठी येणारा खर्च अनामत रक्कमेतून वजा करुन घेण्यात यावा.

७.६.२)ज्या ज्या ठिकाणी पोलिस आणि/अथवा महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असेल,जसे मिरवणूका,प्रदर्शने,सर्कशी,जत्रा,राजकिय मोर्चे,व्यापारी,धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम,निषेध मोर्चे आणि धरणे इत्यादी सार्वजिनक मळावे व कार्यक्रम त्या त्या ठिकाणाची आणि त्याठिकाणी असलेल्या सर्व उपायांची काळजी घेण्यांची व त्या परिक्षेत्रात स्वच्छता राखण्याची जबाबदारी अशा कार्यक्रमांची किंवा मेळाव्यांच्या संघटकांची आयोजकांची राहील.

७.६.३) परताव्याची स्वच्छता अनामत रक्कम असाप्रकारच्या कुठल्याही सार्वजनिक कार्यक्रमांचे अथवा मेळाव्यांचे आयोजक,संबंधित विभाग कार्यालयाकडे कार्यक्रमांचा कालावधी पुर्ण होईपर्यत परताव्याची अनामत रक्कम ठेवतील जी,सदर कार्यक्रमाची जागा पुर्णपणे स्वच्छ करुन कार्यक्रमांच्या जागी निर्माण झालेला कचरा विवक्षीत ठिकाणी पोहोचवल्याची,विभागीय सहाय्यक आयुक्त/संबंधित विभागाचे सहाय्यक आयुक्त/महापालिकेने नियुक्त केलेला अधिकारी यांनी खातरजमा केल्यानंतर परत दिली जाईल.ही अनामत रक्कम फक्त स्वच्छतेसाठी असून त्यात त्या परिवास्तुच्या नुकसानीचा अंतर्भाव नाही.जर अशा संघटकांना आयोजकांना अशा मेळावा/कार्यक्रमांच्या प्रसंगी महापालिकेच्या सेवा उपभोगावयाच्या असतील तर त्यांनी संबंधित विभाग कार्यालयाकडे अर्ज करणे व महानगरपालिकेने केलेल्या दरानुसार योग्य ती रक्कम भरणे आवश्यक आहे.

७.७ खाजगी मालमत्तेवरील कचरा पेट्या खाजगी परिक्षेत्रातील प्रत्येक मालकांना किंवा भोगवटादारांना सार्वजनिक रस्त्यावरुन अथवा पदपथावरुन चालतांना दिसणार नाहीत अशा पध्दतीने त्यांच्या आवारात कचरा पेट्या ठेवणे व परिरक्षीत करणे आवश्यक आहे.

७.८ रस्त्यावर वाहने उभी करण्याचे प्रश्न सार्वजनिक जागी अथवा रस्त्यांवर रात्रीच्यावेळी तसेच व्यापारी भागांमध्ये दिवसा वाहने उभी करण्याने वाहनाखालील जागा अथवा रस्त्याचा भाग साफ करणे शक्य नाही अशा ठिकाणी त्या मोटारीच्या अथवा अन्य वाहनाच्या मालकास सफाई करावी लागेल अन्यथा,सुची-एक मधिल विहित दंड भरावा लागेल

७.९)उतर सार्वजनिक जागा शासनाच्या/नियम शासनाच्या,सांविधिक निगमांच्या मालकिच्या ताब्यात असलेल्या अन्य कोणत्याही सार्वजनिक जागेत ह्या उपविधीची अंमलबजावणी करण्यास ते जबाबदार असतील.

७.१०)भितीवर भित्तीपत्रके अथवा चित्रे लावणे कोणत्याही व्यक्तीने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या पुर्व परवानगीशिवाय भिंती-झाडे किंवा रस्त्यावरील खांबांवर भित्तीपत्रके, फलके अथवा चित्रे चिकटविण्यास अथवा टांकण्यास मनाई आहे.

**८) प्लास्टिक पिशव्याचा वापर ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या**

महाराष्ट्र शासन,पर्यावरण विभाग,यांनी महाराष्ट्र व्रिघटनशिल व अविघटनशिल कचरा (नियंत्रण) अध्यादेश,२००६ आणि त्या अंतर्गत महाराष्ट्र प्लास्टिक पिशव्यांचे (कॅरि बॅग)

(उत्पादन व वापर) नियम २००६ ची अधिसुचना आणि महाराष्ट्र अविघटनशिल घनकचरा योग्य व शास्त्रशुद्ध पद्धतीने संकलन करणे,विलगीकरण करणे,विल्हेवाट लावणे नियम २००६ ची अधिसुचना-अशा अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करुन जारी केलेल्या आहेत.

महाराष्ट्र प्लॉस्टिक पिशव्यांचे(कॅरी बॅग)(उत्पादन व वापर)नियम २००६ नुसार प्लॉस्टिक पासुन बनविलेल्या पिशव्यांची (कॅरी बॅग)किमान ज़ाडी ५० मायक्रॉन पेक्षा कमी नाही आणि पिशव्यांचा आकार ८ X १२ इंचा पेक्षा कमी नाही अशाच फक्त पिशव्यांचा वापर करणे अनुज्ञेय आहे.

८.१) पिशवी विक्री करणारे भोगवटदारास (दुकानदारा) यांचे वर दंडात्मक कारवाई करुन पोलीस गुन्हा नोंद करणे इत्यादी

८.२) हॉटेल,दुकानदार,कारखानदार यांचे कडे प्रथम दंडा त्यानंतर द्वितीय दंड व त्रितिय दंड आकारण्याची कारवाई करणे

८.३)मार्केट परिसरातील भाजी,फळ व इतर वस्तु विक्रेते यांची हातगाडी जप्त करणेची कारवाई करणे.

८.४) स्थानिक नागरिक ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या वापरत असल्याचे निदर्शनास अल्यास दंडात्मक कारवाई करणे

**९ वरील उपविधीचे पालन न केल्यास होणारी शिक्षा.**

९.१)या उपविधीमधील तरतुदींचे उल्लंघन केल्यास अथवा पालन न केल्यास या उपविधी सोबत जोडलेल्या अनुसूची-एक प्रमाणे दंड भरावा लागेल.सदर दंड न भरल्यास त्या व्यक्तिस,भिंती स्वच्छ करणे अथवा रस्ते झाडणे अशा स्वरुपाची,उपद्रव शोधकांनी अथवा अन्य संबंधित अधिकारी व्यक्तिने सुचवलेली किमान एक तासाची सार्वजनिक स्वच्छता/साफसफाई सेवा करावी लागेल.

९.२)या उपविधीमधील तरतूदीचे उल्लंघन करणारे वर्तन चालूच ठेवले तर पुढच्या प्रत्येक नियम बाह्य वर्तनासाठी दर दिवशी १०० रुपये या प्रमाणे मुळ दंडाच्या व्यतिरिक्त दंड आकारला जाईल.

## अनुसुची -१ (दंडसुची)

| अ.क्र | उपविधी क्र. | उपविभाग तपशिल | उपविधी उल्लंघन केल्या दंडीची रक्कम |
|---|---|---|---|
| **उपविधी क्र.४.१ कचरा फेकणे,उपद्रव करणे व साफ अंगण** | | | |
| १ | ४,१ ते ४.४ | कचरा इतरत्र : फेकणे | रु.२००/- |
| २ | ४.५ | उघड्यावर थुंकणे | रु.१००/- |
| ३ | उपद्रव करणे | उघड्यावर स्नान करणे | रु.१००/- |
| ४ | | उघड्यावर लघवी करणे | रु.१५०/- |
| ५ | | उघड्यावर शौचास बसणे | |
| | | प्रथम वेळ | रु.५००/- |
| | | दुस-या वेळी | रु.१०००/- |
| | | तिस-या वेळी | पोलीस गुन्हा नोंद करणे |
| ६ | | रस्त्यावर व्यावसायिकपणे वाहने धुणे | रु.१,०००/- |
| ७ | | रस्त्यावर भांडी/कपडे/तत्सम बाबी धुणे | रु.१००/- |
| ८ | | आपले अंगण स्वच्छ न ठेवणे. | |
| | | अ)एकाच आवाराच्या मालकासाठी भोगवटादारा साठी | रु.१,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४.५ | ब)इमारतीची मलवाहिनी/जलवाहिनी,पाईप लिकेज असल्यास त्यामुळे इतरांना बाधा होत असल्यास समज देऊन देखील १० दिवसात इमारत दुरुस्त न करणे. | रु.१०,०००/- |
| | | **उपविधी क्र.५ – कचरा विभक्तीकरण,साठवण,पुरवठा व संकलन** | |
| १० | ५.१ ते ५.२ | कचरा विलगीकरण करुन न दिल्यास अथवा कचरा स्वतंत्र डब्यात न साठवल्यास | |
| | | १)उघड्यावर कचरा टाकणे झोपडपट्टी परिसर | रु.१०००/- |
| | | २)सोसायटी मध्ये घरातील जमा झालेला कचरा | रु.२५००/- |
| | | ३)कारखाना मधील कचरा | रु.५०००/- |
| | | ४)वैयक्तिक | रु.१००/- |
| | | ५)मोठे निर्माते | रु.५००/- |
| ११ | ५.३ | निर्देशाप्रमाणे ओला कचरा विलगीकरण करुन न दिल्यास | रु.१००/- |
| १२ | ५.५ | धोकादायक कच-याचे निर्देशित पध्दतीने विलगीकरण करुन पुरवठा न केल्यास | रु.१,०००/- ते रु.१०,०००/- |
| १३ | ५.६ | जैविक वैद्यकिय कचरा निर्देशाप्रमाणे विलगीकरण करुन न दिल्यास | रु.२०,०००/- |
| १४ | ५.७ | बांधकाम / पाडकाम कचरा निर्देशाप्रमाणे विलगीकरकरण करुन न दिल्यास | रु.५,०००/- (प्रति टन) |
| १५ | ५.८ | निर्देशाप्रमाणे सुका कचरा विलगीकरण करुन न दिल्यास | रु.१००/- |
| १६ | ५.९ | निर्देशाप्रमाणे झाडांच्या फांद्या अथवा बांधकाम कचरा विलगीकरण करुन न दिल्यास प्रती टन | रु.१००/- |
| १७ | ५.१० | सार्वजनिक ठिकाणी कचरा डब्याच्या बाहेर किंवा इतर निर्देशित ठिकाणी कचरा टाकल्यास | रु.१००/- |
| १८ | ५.११ | कचरा जाळुन निष्कशित केल्यास | रु.१००/- |
| १९ | ५.१२ | ई-वेस्ट विलगीकरण करुन न दिल्यास | रु.१,०००/- घरगुती साठी रु.५,०००/- (वाणिज्य आस्थापना करीता) |
| | | **उपविधी क्र.७ – विशिष्ट गट/प्रासंगिक** | |
| २० | ७.२ | कोंबड्या/मासळी/कत्तलीचा कचरा विलगीकरण करुन न दिल्यास | रु.१०००/- |
| २१ | ७.३ | अ)विक्रेते/फेरीवाले यांनी कचरा डबा न ठेवल्यास | रु.५००/- |
| | | ब)विक्रेते/फेरीवाल्याने कचरा विभक्तीकरण करुन न दिल्यास | रु.५००/- |
| २२ | ७.४ | घरगल्ली व आजुबाचा परिसर स्वच्छ न ठेवल्यास | रु.२०० |
| २३ | ७.५ | पाळीव/मालकीच्या प्रांण्यानी कचरा केल्यास | रु.५००/- |
| २४ | ७.६ | व्यावसायिक सार्वजनिक मेळावे व कार्यक्रमानंतर २४ तासात स्वच्छता न केल्यास | १.०० रु.प्रति चौ.फुट या दराने स्वच्छता अनामतेतुन स्वच्छतेचा खर्च वसुल करणे |
| २५ | ७.८ | रस्ते सफाईच्यावेळी नादुरुस्त,भंगार वाहन रस्त्यावर | १०० रु प्रति दिन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उभे केल्यामुळे अस्वच्छता निर्माण होत असल्यास | |
| २६ | ७.१० | भित्तीपत्रे चिकटवणे/भिती रंगवणे-क्षेत्रफळा नुसार | रु.५०० ते रु.५,०००/- |
| **उपविधी क्र.८ - विशिष्ट गट/प्रासंगिक** | | | |
| | ८ | ५० मॉयक्रॉन् पेक्षा कमी झाडीच्या प्लास्टिक पिशवी | |
| २७ | ८.१ | ५० मॉयक्रॉन् पेक्षा कमी झाडीच्या प्लास्टिक पिशवी विक्री करणे भोगवटदारास(दुकानदार) | रु.२५,०००/- व पोलीस गुन्हा नोंद करणे |
| २८ | ८.२ | हॉटेल,दुकानदार,कारखानदार यांचेकडे ५० मॉयक्रॉन् पेक्षा कमी झाडीच्या प्लस्टिक पिशव्या आढळल्यास | प्रथम - रु.२०००/-<br>द्वितीय - रु.३०००/-<br>त्रितिय - ५०००/- |
| २९ | ८.३ | रोड वरील भाजी,फळ व इतर वस्तु विक्रेते यांचेकडे आढळुन आल्यास | हातगाडी जप्त करणे. |
| ३० | ८.४ | ५० मॉयक्रॉन् पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशवी वापर (नागरिक) करतील. | रु.२००/- |

उप-आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका